तरुण भारत
Apla Nagpur | 2022-03-30 | Page- 4
epaper.tarunbharat.net

# महिला कृषी उद्योजकतेची गुरुकिल्ली

## डॉ. भीमराया मेत्री यांचे मत

◆ **नागपूर, २९ मार्च**

कृषी क्षेत्रात महिलांचे योगदान दीर्घकाळ दुर्लक्षित राहिले आहे. समाज त्यांच्या योगदानाचे योग्य श्रेय देतो. महिला कृषी उद्योजकतेची गुरुकिल्ली असल्याचे मत आयआयएम नागपूरचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी व्यक्त केले. 'शेतीमधील उद्योजकता विकास' या विषयावरील आभासी संवाद सत्रादरम्यान ते बोलत होते.

आयआयएम आणि केंद्रीय महिला कृषी संस्था भुवनेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आभासी चर्चासत्रात ते बोलत होते. शेती पृथ्वीचे भविष्य आहे आणि व्यवस्थापन क्षेत्रातील तज्ज्ञ म्हणून आयआयएमने महिलांना



शेतीतील प्रगतीसह सुसज्ज आणि प्रशिक्षित करण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. यातून महिला रोल मॉडेल म्हणून विकसित होतील, असा विश्वास डॉ. मेत्री यांनी व्यक्त केला. कृषी उत्पादनाला व्यवसायात रूपांतरित करा असेही ते म्हणाले. यावेळी आयसीएआयचे संचालक अनिल कुमार यांनी आयोजनाबद्दल प्रशंसा केली. महिला शेतकऱ्यांना वर्धित कृषी पद्धती पार पाडण्यास मदत करा, असे सांगितले. डॉ. शिवाजी धवड, प्रो. सोम शेखर भट्टाचार्य, डॉ. सच्चिदानंद स्वेन यांचे मार्गदर्शन लाभले.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments